# पेठ पंचायत समिती, पेठ, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७-२००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल.

जा.क्र.स्था-३/ब/पं.स.पेठ/लेपअ/नाशिक/४१५

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक :- १७.१.२००९

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

पेठ पंचायत समिती, पेठ, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७-२००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. स. वा. पारनेरकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १४.१०.२००८ ते २४.१०.२००८ या कालावधीत पूर्ण केले. या प्रारुप अहवालावर श्री. उ. प्र. जोशी, लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी पुर्नविलोकन केले व अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षामध्ये पंचायत समितीचे खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी कामकाज पहात होते.

**सभापती-**

| | |
|---|---|
| श्री. भास्करराव गोपाळ गावित | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गट विकास अधिकारी -**

| | |
|---|---|
| श्री. ए. व्ही. थुळे | १.४.२००७ ते १०.६.२००७ |
| श्री. एस. के. केदारे (प्र.) | ११.६.२००७ ते २७.८.२००७ |
| श्री. जी. बी. कटारे (प्र.) | २८.८.२००७ ते २२.१०.२००७ |
| श्रीमती एम. एम. जाधव | २३.१०.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण)

---

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद प्रलंबित असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९७२-७३ | ३,४,५,८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३-अपूर्ण नालाबंडींगचे अपूर्ण काम (२६४)<br>परि.क्र.४-अपूर्ण नालाबंडींगचे काम पूर्ण केल्याने अमान्य असलेल्या अनुदानाची रक्कम -९४१६ (२७४)<br>परि.क्र.५-अपूर्ण बागायती विहीरी पूर्ण न केलेबाबत(२७०)<br>परि.क्र.८-खते व बियाणे वसूली (२९४) | ४ |
| २ | १९७५-७६ | १५(ब,क,ड,इ),२१(अ,ब) | २ |
| ३ | १९७९-८० | ४,१४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४(अ)-हत्यारे व औजारेबाबत (६.१६)<br>परि.क्र.१४-सिमेंट विक्रीची थकबाकी वसूल करणेबाबत (६.१४९) | २ |
| ४ | १९८१-८२ | ७(अ,ब)<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.७(अ,ब): अनामत रक्कमेतील हिशोबांत अनियमितता (६.११५(ब) | १ |
| ५ | १९८२-८३ | ३,५,१२<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.५-मंगलौरी कौले व ढापे खरेदी (६.१२९) | ३ |
| ६ | १९८३-८४ | ३(अ,ब),४,५,६,१५ | ५ |
| ७ | १९८४-८५ | ३,६(अ,ब), | २ |
| ८ | १९८५-८६ | ४,६<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.६-निवासस्थान भाडे वसूली केली नाही (६.१७६) | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १९८६-८७-८८ | ३(२),४,२२<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.२२-अपूर्ण बांधकामे (६.१९६)(१३) | ३ |
| १० | १९८९-९० | ३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.३-शेतकी निवासस्थान बांधकामाबाबत (६.३२) | १ |
| ११ | १९९०-९१ | १०<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१०-अपूर्ण बांधकामाबाबत (६.१७१) | १ |
| १२ | १९९१-९२ | १३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१३-अपूर्ण बांधकामाबाबत (६.१३०(३) | १ |
| १३ | १९९२-९३ | ७ | १ |
| १४ | १९९३-९४ | ४,१५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१५-अपूर्ण बांधकामाबाबत(६.११०(६)) | २ |
| १५ | १९९४-९५ | ७,२२ | २ |
| १६ | १९९५-९६ | ५,६,१०,१३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१० – पाणी पुरवठा योजना व उपसा जलसिंचन योजनेचे साहित्य विनावापर पडून असल्याबाबत. (४.१२०(११)) | ४ |
| १७ | १९९६-९७ | १४,३६,४२<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.४२-अपूर्ण बांधकामाबाबत (४.७९(१५) | ३ |
| १८ | १९९७-९८ | १७,१८,३५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.३५-मुदतबाहय धनादेश रद्य केलेबाबत (४.९५(६) | ३ |
| १९ | १९९८-९९ | ७,२०,२१,२४,२५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.७-हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकी (४.११४)<br>परि.क्र.२०-अपूर्ण बांधकामाबाबत (४.१०९)<br>परि.क्र.२१-प्रलंबित अग्रिम रक्कमाबाबत(४.११२) | ५ |
| २० | १९९९-२००० | ३,४,७,८,९,१२,२२,२३,२५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.४-हातपंप विद्युतपंप वर्गणी वसुलीबाबत ४.१०४(१६) | ९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्र.८-सिमेंट गोण्यांची रक्कम वसूलीबाबत ४.१००(१२)<br>परि.क्र.९-सिमेंट गोण्यांची रक्कम वसूलीबाबत ४.१००(१३)<br>परि.क्र.२२-अपूर्ण बांधकामाबाबत ४.१०२(१८)<br>परि.क्र.२३-प्रलंबित अग्रिम रक्कमेबाबत ४.१०५(१०) | |
| २१ | २०००-०१ | ३,७,८,१५,१९<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१५ अपूर्ण बांधकामाबाबत (४.१८२(१६) | ५ |
| २२ | २००१-०२ | ३,४,६,७,९,१२,१३,१४,१६,२०,२४,२६,२८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३- रोखवही व बॅकपासबुकांच्या शिल्लकेतील तफावतीबाबत (४.२४३(५)<br>परि.क्र.९-एकात्मिक बालविकास प्रकल्प हरसूल येथील रोख रक्कम चोरीस गेल्याबाबत (४.२१६)<br>परि.क्र.१२-अपूर्ण बांधकामे ल.पा.उपविभाग पेठ हरसूल (४.२४७(४)<br>परि.क्र.१३- प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत (४.२५०(५)<br>परि.क्र.१४- विदयुतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी (४.२४९(६)<br>परि.क्र.२०- पोहच पावत्या उपलब्ध नसणेबाबत (४.२५२(१०)<br>परि.क्र.२४- अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत. (४.२५१(२)<br>परि.क्र.२६- धनादेश न वटणेबाबत (४.२५२(४)<br>परि.क्र.२८-धनादेश न वटणेबाबत (४.२५२(४) | १३ |
| २३ | २००२-०३ | ३,५,१३,२५,२७,२८,२९,३३<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.२७:- अनामत रक्कमा व्यपगत न केलेबाबत.(४.२०५(७)<br>परि.क्र.२८:- अपुर्ण बांधकामाबाबत.(४.२०१(१३) | ८ |
| २४ | २००३-०४ | ३,४,५,९,१२,१८,२५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.९:- थकीत अग्रीम रक्कमांबाबत (४.२०१(२)<br>परि.क्र.१२ :- गणवेशाचे वाटप केले नसल्याबाबत(४.१२) | ७ |
| २५ | २००४-०५ | ६,८,११,१२,१३,१५,१६<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.११:- अपूर्ण गावतळेबाबत (४.३३२(१७)<br>परि.क्र.१३ :- विशेष घटक योजना व आदिवासी क्षेत्रांवरील आदिवासी उपयोजनाअंतर्गत अपूर्ण विहिरींबाबत (४३३२(१८) | ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | २००५-०६ | ५,६,७,१०(२,३,४,५),१३,१७,१८,१९,२१,२३,२४,२५,२६,२७,३१<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.५-पंचायत समिती उपकरातून राबविलेल्या ताडपत्री वाटपाच्या योजनेबाबत (४.२३०)<br>परि.क्र.६-पंचायत समिती पेठ ते आयोजित केलेल्या रोगनिदान शिबिराबाबत. (४.७११)<br>परि.क्र.१८- थकीत अग्रीम रक्कमांबाबत (४.७३१(४))<br>परि.क्र.१९- अनामत सदरी ३ वर्षापेक्षा जास्त काळ जमा असलेल्या रक्कमांबाबत (४.७३३(१२)<br>परि.क्र.२५- अपूर्ण विहिरी व इतर बांधकामाबाबत (४.७२८(२२)<br>परि.क्र.२६- हातपंप/विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसूलीबाबत (४.७३०(१२) | १५ |
| २७ | **लेखा परीक्षण अहवाल सन २००६-२००७** | | |
| परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेस अंतर्गत एकात्मिक बाल विकास योजनांतर्गत अंगणवाडीकरिता वॉटर फिल्टर खरेदीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- तालुका मास्तर पेठ - रोखवहीतील अनियमितता | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- पंचायत समिती सेस अंतर्गत कृषी गोडाऊन दुरुस्तीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ (अ) :- किरकोळ रोखवहीतील अनियमितता | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ (ब) :- स्थायी अग्रीम खर्चातील अनियमिततेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ८ :- ग्रामपंचायतीस देण्यात येणा-या अनुदानाच्या नमुना नंबर ७ च्या पोचपावत्या उपलब्ध न झालेबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ९ :- अतिवृष्टी तसेच धरणातील पाणी सोडल्या / पुरपरिस्थितीमुळे अंगणवाडी केंद्र इमारतीच्या दुरुस्ती / पुनर्बांधणीसाठी अनुदान वितरणाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १० :- रिकाम्या गोण्या नोंदवहीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ११ :- जंगम मालमत्ता नोंदवहीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १२ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसूलीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १३ :- बांधकाम उपविभाग, पेठ यांचेकडील नोंदवही नमुना नंबर ३९,४० व ४१ अपूर्ण असलेबाबत..... | | | |
| परिच्छेद क्रमांक १४ :- थकीत अग्रीम रक्कमांबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १५ :- अल्पबचत अनुदानाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १६ :- कृषी उपविभाग पेठ - अपूर्ण टी.एस.पी. विहीरींबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १७ :- अपूर्ण जवाहर विहिरी व गावतळेबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक १८ :- १२ वा वित्त आयोग इ व द उपविभाग पेठ अपूर्ण बांधकामांबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १९ :- आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक २० :- लेख्यांची स्थिती. |
| परिच्छेद क्रमांक २१ :- वार्षिक लेखे. |
| परिच्छेद क्रमांक २२ :- अनुपालन व पोहोच. |

**टिप:** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात त्या-त्या वर्षाचे पुढील अभिप्रायांमध्ये नमुद करणेत आलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

## भाग दुसरा
## चालु लेखापरीक्षण

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम ९(अ) खालील येणारी अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १ :- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, पेठ, जिल्हा नाशिकचे सन २००७ – २००८ चे मुळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक १६६ दिनांक २३.११.२००८ व सुधारीत अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक २१ दिनांक १.२.२००८ ने मंजूर केले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सुधारित तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ बांधकाम इ व द | २०,९७३ | -- | २०,९७३ | -- |
| २ | १४ समाज कल्याण | ५,९९३ | ६,००० | -- | ०७ |
| ३ | २० संकीर्ण महिला व बालकल्याण | २,९९६ | -- | २,९९६ | -- |
| | **एकूण** | **२९,९६२** | **६,०००** | **२३,९६९** | **०७** |

सुरुवातीची शिल्लक रु. १,०७६ + प्राप्त अनुदान रु. ३१,७३२/- अशी एकूण उपलब्धता रुपये ३२,८०८/-

सदर खर्चावर खालीलप्रमाणे सर्वसाधारण अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक वाजवी नियोजनपूर्वक वस्तुस्थितीस धरुन केले नसल्याचे दिसून आले आहे. कारण मागील वर्षाचे शिल्लक अनुदान व चालु वर्षी आलेले अनुदान मिळून रक्कम रुपये ३२,८०८/- जमा असतांना खर्च रक्कम रुपये ६,०००/- करण्यात आलेला आहे. तो तरतुदींपेक्षा रक्कम रुपये २३,९६२/- व प्राप्त अनुदानापेक्षा रक्कम रुपये २६,८०८/- ने कमी आहे. याचाच अर्थ अदांजपत्रक नियोजनपूर्वक व वस्तुस्थितीस धरुन केलेले नाही.

२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमाक मागास-१०९८/प्र.क्र.७३/३४ दिनांक २०.१०.१९९९ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी

त्यांच्या उत्पन्नाच्या २०% निधी समाजकल्याणावर व १०% महिला व बालकल्याणावर खर्च करणे आवश्यक असतांना महिला व बालकल्याणावर कोणत्याही प्रकारचा खर्च करण्यात आलेला नाही. याबाबत शासनाचे क्षमापन घ्यावे.

३) उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे विविध लेखाशिर्षाखाली खर्चासाठी केलेल्या तरतुदीपेक्षा रक्कम रुपये २३,९६९/- एवढया रक्कमेची बचत झाल्याचे दिसून येते. पुरेसा निधी उपलब्ध असतांना सुध्दा बचत झाली आहे. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक पंरास/१०९३/प्र.क्र./१४४३/२७/ दिनांक २०.९.१९९३ नुसार उपलब्ध निधीचा पुरेपुर विनियोग ग्रामीण जनतेला होईल. याबाबत अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घ्यावी, अशा सूचना आहेत. ज्या योजनेसाठी खर्च करणे आवश्यक व संभवनीय होते अशा योजनांसाठी तरतूद केली असती अथवा नियोजन पूर्वक कामे केली असती तर बचत झाली नसती. बचतीचे सार्थ स्पष्टीकरण करुन पंचायत समिती सभेचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

४) मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार, पेठ यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून या पंचायत समितीचा दिनांक ३१.३.२००८ अखेर किती उपकर वसूल झाला, यातील किती प्राप्त व्हावयाचा आहे. याबाबत ताळमेळ घेऊन तशी पुर्तता द्यावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २ :- अनामत नोंदवहीतील अनियमिततांबाबत.</u>**

पंचायत समिती, पेठची सन २००७ – २००८ अखेरच्या अनामत नोंदवहीची पडताळणी केली. त्यामध्ये खालील दर्शविलेल्या रक्कमा अनामत सदरी दर्शविलेल्या आहेत.

| दिनांक | तपशिल | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| २०.१.२००३ | ग्रा.पं. कर्मचारी अनुदान | १,६६,३९७ |
| २०.१.२००३ | ग्रा.पं. कर्मचारी अनुदान | ३७,८०० |
| २८.२.२००३ | न वटलेले धनादेश ग्रा.पं.अनुदान | २,३६,२५४ |
| २८.२.२००३ | न वटलेले धनादेश सुलभ शौचालय | १,३५,८१३ |
| १७.५.२००३ | सरपंच मानधन | ९५० |
| १६.७.२००३ | अंगणवाडी कार्यकर्ती ट्रेनिंग मानधन | ६५० |
| ३१.३.२००४ | जमीन महसुल अनुदान | १६,८६५ |
| ३१.३.२००४ | ग्रा.पं.अनुदान | ६४,२५४ |
| ३१.३.२००४ | ५० टक्के विद्युत देयक चार्जेस | ७१,४८१ |
| | **एकूण :-** | **७,३०,४६४** |

प्रत्यक्षात उपरोक्त दर्शविलेल्या रक्कमा हया तीन वर्षावरील असून, लेखासंहिता नियम २०९(०७) नुसार पंचायत समिती पेठने त्या व्यपगत करुन शासनास योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक होते. तथापि पंचायत समितीने तशी कार्यवाही न करता माहे ऑक्टोंबर २००७ मध्ये रोकडवहीमध्ये जमा व खर्च नोंदवुन पुन्हा अनामत सदरी जमा घेतलेल्या आहेत. सदरची कार्यवाही नियमबाहय असून तात्काळ सदरच्या रकमा व्यपगत करणेसह हया योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० चे कलम ९(ब) खालील येणारी अनियमितता.

---

### परिच्छेद क्रमांक ३ :- रोख रक्कम हाताळण्याबद्दल प्रदान करण्यात आलेल्या विशेष वेतनाबाबत.

पंचायत समिती पेठ अंतर्गत सर्व विभागातील जे कर्मचारी रोख रक्कम हाताळत आहेत, अशा एकूण ४६ कर्मचा-यांपैकी ४१ कर्मचा-यांना या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ठ क्रमांक “१” मध्ये नमुद केल्याप्रमाणे दरमहा विशेष वेतन प्रदान करण्यांत येत आहेत.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेतन-१२९८/प्र.क्र.१६/९८/सेवा-३/ दिनांक २३.१२.१९९८ नुसार रोखभत्ता / विशेष वेतनाचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत व शासन निर्णय क्रमांक एसएसपी-१२८८/५७८/सेवा १० दिनांक १७.१०.१९८८ मधील परिच्छेद २(७) नुसार रोखभत्ता / विशेष वेतन मंजूर करतांना दरवर्षी आर्थिक व्यवहारांचे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे.

सन २००७ – २००८ या कालावधीत सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते बँकेमार्फत प्रदान करणे शासन निर्णय दिनांक २९.८.२००५ नुसार बंधनकारक होते. त्यानुसार अंमलबजावणी सुरु झाल्यामुळे घटलेल्या रोख हाताळणीनुसार कर्मचा-यांना दिल्या जाणा-या विशेष वेतनाचा पुर्नआढावा घेणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने याबाबत उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींचे पालन न करता संबंधित विभागाने वेतन देयकात आकारणी केलेली विशेष वेतनाची रक्कम प्रदान केली आहे. सदर विशेष वेतनास कोणत्याही प्राधिका-याने मंजूरी दिलेली नसतांना नियमबाह्यपणे विशेष वेतनाचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात प्रदान केले आहे. याबाबत सर्व संबंधितांची जबाबदारी निश्चित

करावी व प्रत्यक्ष रोख रक्कमेच्या हाताळणीचे आधारे दिलेल्या विशेष वेतनांचा पूर्ण आढावा घेऊन अतिप्रदानाची रक्कम वसूल करुन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- व्यवसाय कर चुकीच्या दराने कपात केल्याबाबत.**

पंचायत समिती पेठ यांचेकडील माहे फेब्रुवारी २००८ या महिन्याच्या प्रदान वेतन देयकांची पडताळणी केली असता खालील नमुद तपशिलानुसार रुपये १०,०००/- पेक्षा अधिक एकूण वेतन घेणा-या कर्मचा-यांची व्यवसाय कर कपात प्रत्येकी रुपये ३००/- ऐवजी रुपये २००/- या दराने करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | प्र. क्र. | दिनांक | विभागाचे नाव | रु. १०,०००/- पेक्षा जास्त वेतन असणा-या कर्मचा-यांची संख्या | व्यवसाय कर कमी कपात केल्याची रक्कम (रुपये) | एकूण वसूलपात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६५ | १८.३.२००८ | लेखा शाखा | २ | १०० | २०० |
| २ | ६६ | १८.३.२००८ | ग्रामपंचायत | ८ | १०० | ८०० |
| ३ | ८० | १८.३.२००८ | शिक्षण | ८ | १०० | ८०० |
| ४ | ९५ | १९.३.२००८ | शिक्षण | ६ | १०० | ६०० |
| ५ | ९८ | २४.३.२००८ | सा.बांधकाम | १२ | १०० | १,२०० |
| ६ | १३४ | ३१.३.२००८ | ए.बा.वि.प्र. | ११ | १०० | १,१०० |
| | | | | | **एकूण** | **४,७००** |

मा. आयुक्त, व्यवसाय कर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पी. एफ. टी. /२००६/पी.टी./ॲडम-७/१५/बी-२११ दिनांक २५.५.२००६ नुसार माहे फेब्रुवारी या महिन्यात रुपये १०,०००/- पेक्षा जास्त वेतन असणा-या कर्मचा-यांची व्यवसाय कर कपात रुपये ३००/- या दराने करणे आवश्यक असतांना रुपये २००/- या दरानेच कपात करण्यात आलेली आहे.

तरी कमी कपात केलेली व्यवसायकराची संबंधित सर्व कर्मचा-यांकडून प्रत्येकी रुपये १००/- प्रमाणे एकूा ४,७००/- वसूल करुन शासनास चलनाने भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ४,७००/-
००२८ व्यवसाय कर

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- वाहनाच्या गैरवापराबाबत.**

(१) पंचायत समिती, पेठ जीप क्रमांक एम एच १५, अेअे – ५०६८ ची सन २००७ – २००८ ची वाहनरोजनिशी व पंचायत समिती सभेची इतिवृत्त नोंदवही तपासली असता सभापती/ उपसभापती/ गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती मासिक सभेला उपस्थित असतांना त्याच तारखेस खालीलप्रमाणे उपरोक्त वाहनाचा वापर केल्याचे नमुद केले आहे.

| वाहन रोजनिशीतील दिनांक व मासिक सभेचा दिनांक | वाहन रोजनिशीमधील वेळ | वाहन रोजनिशीतील वाहन वापर (कि.मी.) | वाहन वापरणारे पदाधिकारी / अधिकारी |
|---|---|---|---|
| २४.०५.२००७ | ०८.०० ते २०.३० | ११० | गटविकास अधिकारी |
| १४.०८.२००७ | ११.०० ते २०.०० | २६ | उपसभापती |
| ११.१०.२००७ | नमुद नाही | ३४ | गटविकास अधिकारी |
| ०१.०२.२००८ | ०८.०० ते २०.३० | ३० | सभापती |
| ०४.०३.२००८ | १०.०० ते नमुद नाही | १५० | नांव नमुद नाही. |
| | **एकूण :-** | **३५०** | |

उपरोक्त नमुद तपशिलानूसार मासिक सभेला सभापती/ उपसभापती/ गटविकास अधिकारी उपस्थित असतांना त्याच तारखांना वाहनांची फिरती त्याच अधिकारी/ पदाधिकारी यांनी कशी केली. यावरुन सदर वाहन रोजनिशीतील नोंद किंवा सभेतील त्यांची उपस्थिती याची नोंद याबाबत एक नोंद खोटी दर्शविण्यात आली आहे. मासिक सभेतील त्यांची उपस्थिती ग्राहय धरता वाहन रोजनिशीतील एकूण कि.मी. ३५० चे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक प्रवास १००५/प्र.क्र.३३/सेवा-५ दिनांक ८.७.२००५ अन्वये दर रुपये ८/- प्रति किमी. प्रमाणे ३५० किलोमीटर प्रवासाची रक्कम रुपये २,८००/- संबंधितांकडुन वसूल करावी तसेच केलेल्या गंभिर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन सदर अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

(२) दिनांक ३.३.२००८ ते ३१.३.२००८ या कालावधीमध्ये वाहन रोजनिशीमध्ये वाहन कोणत्या अधिका-याने/पदाधिका-याने यांच्या स्वाक्ष-या व प्रयोजन नमुद केलेले नाही. सदर कालावधीत केलेला एकूण प्रवास १,३१२ किलोमीटर असून याबाबत शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक प्रवास १००५/प्र.क्र.३३/सेवा-५ दिनांक ८.७.२००५ अन्वये दर रुपये ८/- प्रति किमी. प्रमाणे १,३१२ किलोमीटर प्रवासाची रक्कम रुपये १०,४९६/-

संबंधितांकडुन वसूल करुन व केलेल्या गंभीर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

वसुलपात्र रुपये १३,२९६/-

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत.**

पंचायत समिती, पेठ या कार्यालयाची जीप क्रमांक एम एच १५, अेअे – ५०६८ ची सन २००७-०८ ची वाहननिशी तपासली असता या अहवालासोबत जोडण्यात आलेले परिशिष्ट क्रमांक “ २ ” नुसार वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याचे स्पष्ट होते.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ४१४५ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ३३,१६०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ३३,१६०/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० चे कलम ९(क) खालील येणारी अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- थकीत अग्रीम रक्कमांबाबत.**

सोबतच्या विवरणपत्र क्रमांक “ २ ” नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर कार्यालयातील कर्मचारी / शिक्षक यांचेकडे धान्य, उत्सव, वेतन, बदलीप्रवास भत्ता इत्यादी प्रकारच्या अग्रीमांची रक्कम रुपये ४,६०,०१६/- सन १९६६-१९६७ पासून थकीत असल्याचे दिसून येते.

बदली प्रवास भत्ता व वेतन अग्रीमाची परतफेड कर्मचा-यांनी ३ महिन्याचे आत केली नाही तर अशा कर्मचा-यांकडून नियमाप्रमाणे अग्रीमांची वसुली त्यांचे वेतनातून करणे आवश्यक असतांना वसुली केली नसल्याने ब-याच कालावधीपासून कर्मचा-यांकडून अग्रीमाच्या रक्कमेची वसुली थकीत दिसते. याबाबत सन २००६ – २००७ च्या

लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक १४ नोंदविण्यात आला असतांनाही याबाबत पूर्तताविषयक काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. लेपुअ/१०९२/प्र.क्र. १४६९/३०९३ दिनांक २६.२.१९८३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीम रुपये ४,६०,०१६/- वसुल करणेची उपाययोजना करुन संपूर्ण वसुलीअंती अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

## मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० चे कलम ९(ड) खालील येणारी अनियमितता.

### परिच्छेद क्रमांक ८ :- निधींच्या रोकडवहयांमधील शिलकेबाबत.

पंचायत समिती, पेठ, सन २००७-०८ मधील जिल्हानिधी, अभिकरण योजना, जिल्हापरिषद सेस निधींच्या रोकडवहयांची पडताळणी केली असता, दिनांक ३१.३.२००८ अखेर खालीलप्रमाणे रक्कमा शिल्लक आहेत.

| योजना | रक्कम रुपये |
|---|---|
| जिल्हानिधी | ५४,९८,४३३ |
| अभिकरण योजना | ३४,००,७२७ |
| जिल्हापरिषद सेस | ५०,२१,८०४ |

उपरोक्त नमुद दिनांक ३१.३.२००८ अखेर शिल्लक रक्कमांबाबत ताळमेळ नमुद करण्यात आलेला आहे. तथापि शिल्लक रक्कमा ह्या कोणत्या आर्थिक वर्षातील व कोणत्या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातून अखर्चित राहिलेल्या आहेत. याबाबत बाबनिहाय गोषवारा नमुद केलेला नाही. तरी असा आर्थिक वर्षे निहाय व बाबनिहाय गोषवारा नमुद करुन अखर्चित रक्कमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन सदरी भरणा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

### परिच्छेद क्रमांक ९ :- अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत.

पंचायत समिती पेठ यांचेकडील अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता सदर नोंदवहीत खालील नमुद केल्याप्रमाणे ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या रक्कमा जमा आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. सन २००२ – २००३ | रुपये | ४,०००/- |
| २. सन २००४ – २००५ | रुपये | १,६१,७३४/- |
| **एकूण** | **रुपये** | **१,६५,७३४/-** |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २०९(७) नुसार अनामत सदरी जमा केलेल्या रक्कमा ३ वर्षात मागणी न केल्यास व्यपगत करुन संकीर्ण जमा या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक असून अशा व्यपगत ठेवींचे प्रदान लेखासंहिता नियम २०९(८) नुसार स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय करता येत नाही.

तथापि पंचायत समिती पेठ यांनी अशी कार्यवाही केलेली नाही. तरी तीन वर्षावरील एकूण जमा रक्कम रुपये १,६५,७३४/- व्यपगत करुन संकिर्ण जमा या लेखाशिर्षाखाली जमा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक १० :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेनुसार कपात केलेल्या अशंदान रक्कमेबाबत.

पंचायत समिती, पेठ यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम कपात करुन दिनांक ३१.३.२००८ अखेर पर्यंत या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक " ३ " नुसार रुपये ५४,५८८/- ठेव सदरी जमा केलेली आहे.

या संदर्भात अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत:

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४/ दिनांक ७.७.२००७ अन्वये नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ८ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची माहिती नमुना नंबर १ मध्ये प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन सदर कर्मचा-यांचा "निवृत्ती वेतन लेखा क्रमांक" प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना योग्य त्या फेर फारांसह सदर योजना लागू करण्यात अली असून कर्मचा-यांना अंशदानाइतके समतुल्य अशंदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरणास जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, पेठ यांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडून अद्यापपावेतो संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करुन घेतलेले नाही, कर्मचा-यांकडून कपात केलेली अंशदानाची रक्कम ठेव सदरी जमा ठेवलेली

आहे. तसेच कर्मचारी अशंदानाइतके समतुल्य जिल्हा परिषदेचे अंशदान प्रदान करण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही.

कपात केलेली अंशदानाची रक्कम त्यावर देय होणारे व्याज संस्थेचा हिस्सा व त्यावरील व्याज व सदर योजनेनुसार समाविष्ठ कर्मचा-यांच्या भविष्याबाबतचे दायित्व हे अंशदान वसूली केल्यापासून ते राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना प्रदान होईपर्यंत प्रत्येक संस्थांच्या कार्यालय प्रमुखावर असल्याने निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करणेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करणेची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यालय प्रमुख नात्याने गटविकास अधिकारी यांचेवर आहे.

तरी याबाबत पंचायत समिती पेठ यांनी उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन खाते क्रमांक प्राप्त करुन घेऊन ठेव सदरी जमा केलेली रक्कम व कर्मचा-यांच्या अंशदानाइतके समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरण मुंबई यांचेकडे त्वरीत जमा करावे पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- निवृत्ती वेतन प्रदानातील अनियमितता**

पंचायत समिती पेठ अंतर्गत १९ सामान्य प्रशासन व ३ शिक्षण निवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची पडताळणी करता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समती लेखासंहिता १९६८ चा नियम ७६(२) नुसार निवृत्ती वेतन मागणी नमुना क्रमांक एपीपी १२ या विहित नमुन्यात तयार करणे आवश्यक असतांना ती नमुना नंबर २६ च्या वेतन देयकाच्या नमुन्यात तयार करण्यात येत आहे.

२) लेखासंहिता परिशिष्ट ४ नियम ७७ नुसार दरवर्षी निवृत्ती वेतन धारकांकडून हयातीचे दाखले प्राप्त करणे अवश्यक असतांना दाखले प्राप्त न करताच निवृत्ती वेतन प्रदान करण्यांत येत आहे.

३) लेखासंहिता परिशिष्ट ४ नियम ८० नुसार ज्यांचे निवृत्ती वेतने विवाहानंतर किंवा पुनर्विवाहानंतर बंद होण्याजोगी असतील अशा स्त्री निवृत्तीवेतन धारकांच्या बाबतीत नमुना नंबर ए.पी.पी. १४ मधील प्रमाणपत्र दर जून व डिसेंबर महिन्यात प्राप्त करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

४) लेखासंहिता परिशिष्ट ४ नियम ६९ नुसार प्रत्येक निवृत्ती वेतन प्रदानाची नोंद नोंदवही नमुना क्रमांक ए.पी.पी. ९ मध्ये घेणे आवश्यक असतांना शिक्षण विभागाने सदर नोंदवही परिरक्षित केलेली नाही.

५) सामान्य प्रशासन विभागाकडील नोंदवही नमुना नंबर ए.पी.पी. ९ मध्ये निवृत्ती वेतन धारकाचे नाव नमुद केले आहे. उर्वरित सर्व स्तंभ कोरे ठेवण्यात आलेले आहेत. सदर

नोंदवहीत प्रदानाचा तपशिल परिपूर्ण नोंदविण्यात आलेला नसून नमुद तपशिल संबंधित जबाबदार अधिका-यांनी साक्षांकीत केलेला नाही.

६) निवृत्ती वेतन प्रदान आदेशात व नोंदवही ए.पी.पी. ९ मध्ये निवृत्ती वेतनाच्या दरात झालेल्या बदलाची सुधारीत आदेश क्रमांकासह नोंद घेऊन ती संबंधित अधिका-यांनी साक्षांकीत करणे आवश्यक असतांना बहुतांशी प्रकरणात अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे मंजूर दर आणि प्रदान दर यामध्ये तफावत आढळून येते.

सामान्य प्रशासन विभागाकडील निवृत्ती वेतन धारक श्रीमती. म्हाळसाबाई पांडूरंग शार्दुल यांना रुपये ५९५/- निवृत्ती वेतन मंजूरीची व त्यांनी रुपये १९८/- चे अंशराशीकरण केल्याची नोंद आहे. प्रत्यक्षात त्यांना रुपये १,८७१/- दराने निवृत्ती वेतन प्रदान करण्यात येत असून अंशराशीकरणाची कपात करण्यात येत नाही. तसेच श्री. नामदेव नारायण सातपुते यांना निवृत्ती वेतन रुपये १,०४३/- व अशंराशीकरण रुपये ३४७/- ची नोंद असतांना प्रत्यक्ष प्रदान रुपये ३,१७६/- दराने करण्यात येत असून रुपये १,०५८/- अशंराशीकरण रक्कम कपात करण्यात येत आहे. संबंधित निवृत्ती वेतन धारकांच्या निवृत्ती वेतन दरात झालेल्या बदलाची आवश्यक ती नोंद घेण्यात आलेली नाही.

७) शिक्षण विभागाने दरमहा प्रदान रक्कमेची नोंद निवृत्ती वेतन प्रदान आदेश प्रतीवर न घेता फक्त प्रदान महिन्यांची नोंद घेतली असून माहे ३/२००४ नंतर अशा नोंदीवर गटशिक्षणाधिकरी यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र. १८ व क्रमांक १९ दिनांक १७.१०.२००८ अन्वे उपरोक्त नोंदवह्या अद्ययावत करुन लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत कळविण्यात आले असतांनाही लेखापरीक्षण कार्य काळात कोणतीही पुर्तता करण्यात आलेली नाही.

लेखासंहिता परिशिष्ठ ४ नियम ८१ नुसार निवृत्तीवेतनाच्या चुकीच्या प्रदानास संवितरण अधिकारी व्यक्तिश: जबाबदार असल्याने उपरोक्त अनियमिततेबाबत परिपूर्ण पुर्तता करुन व होणारे प्रदान बरोबर असल्याची खात्री करुन मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या क्षमापनासह अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १२ :- दुबार प्रदान देयकातील भरण्यांबाबत.</u>**

पंचायत समिती, पेठ सन २००७-०८ मधील अभिकरण योजनेच्या निवडक महिन्यांचे लेखापरीक्षण केले असता एकात्मिक बालविकास विभागाकडील प्रमाणक क्रमांक १७८ दिनांक ३१.३.२००८ व प्रमाणंक क्रमांक १७९ दिनांक ३१.३.२००८ ही अंगणवाडी कार्यकर्तीचे एकाच कालावधीतील प्रवासभत्ते देयके असून ती दुबार प्रदान झालेली आहेत.

सदरची दुबार देयके संबंधीत कार्यालयास निदर्शनास येताच त्यांनी दिनांक १.९.२००८ रोजी सदरची रक्कम रुपये १३,४५८/- शासकीय लेखाशिर्षाखाली

परस्पर भरणा केलेली आहे. सदरची कार्यवाही नियमबाहय केलेली असून, तो भरणा अभिकरण योजनेच्या खात्यामध्ये जमा होणे आवश्यक होते व त्यानंतर लेखा विभाग, पंचायत समिती यांनी ती रक्कम शासनास परत करणे आवश्यक होते.

परस्पर भरणा केल्यामूळे सदरचा भरणा योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा झाला असल्याची खात्री लेखा विभागाने करणे आवश्यक आहे. तरी झालेला भरणा योग्य लेखाशिर्षाखाली झाल्याची खात्री करुन सदर अनियमिततेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या क्षमापनासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसूलीबाबत.**

पंचायत समिती, पेठकडील सन २००७-२००८ या कालावधीसाठी हातपंप, विद्युतपंप देखभाल दुरुस्ती नोंदवहीची पडताळणी केली असता, परिशिष्ट क्रमांक " ४ " मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण मागणी रु. २,००,६८७/- पैकी रुपये १,४३,००९/- रक्कम वसुल झाली आहे. मात्र रुपये ५७,६७८/- वसुल होणे बाकी आहे. याबाबत शासनाचे पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक भुजल/ १०९५/ प्र.क्र.२१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप विद्युतपंपाची प्रलंबित वर्गणी संबंधीत ग्रामपंचायतींकडून रोखीने अथवा त्यांना देय अनुदानातून प्राधान्याने वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- जादा वेतनवाढ दिलेबाबत.**

पंचायत समिती, पेठ सन २००७-०८ मध्ये आस्थापना विभागातील सेवापुस्तकांची पडताळणी केली असता, श्रीमती एस.के.मोंढे, परिचर, प्राथमिक आरोग्य केंद्र, कोहोर यांना दिनांक १.७.२००७ रोजी मुळ वेतन रुपये ३,१७०/- देय असतांना रुपये ३,२३०/- दिल्याने जादा मुळ वेतन व त्यावरील भत्त्यांची परिगणना करुन संबंधीताकडून रक्कम वसुल करण्यात यावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- दलितवस्ती अपूर्ण कामांबाबत.**

पंचायत समिती पेठ यांचेकडील दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत समाजकल्याण विभागाकडून प्राप्त अनुदानातून सन २००७ – २००८ अखेर ग्रामपंचायत कापुर्णे येथील पिण्याच्या पाण्याची विहिर अपूर्ण असून त्यासाठी रुपये १,६०,०००/- इतके अनुदान पहिल्या व दुस-या हप्त्यापोटी ग्रामपंचायतीला वितरीत करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक जिपना/नाशिक/दवसु/३१०१/-/२००६ दिनांक २३.३.२००६ अन्वये ग्रामपंचायत कापुर्णे अंतर्गत नविन पिण्याच्या पाण्याची विहिरींसाठी रुपये २,००,०००/- अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक ३१.३.२००७ अखेर रुपये १,६०,०००/- इतके अनुदान ग्रामपंचायतीस वितरीत केले आहे. परंतु सन २००७ – २००८ अखेर सदरचे काम पूर्ण झालेले नाही.

सदर कामाचे धावते मुल्यांकन दि. १३.७.२००७ नुसार रुपये १,८१,८८५/- इतक्या रक्कमेचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम ग्रामपंचायतीने पूर्ण केले नाही व अंतिम हप्त्याची मागणीही करण्यात आलेली नाही. यावरुन सदर ग्रामपंचायत उर्वरित काम पूर्ण करण्यास अनुकुल दिसत नाही.

मंजूरी आदेशातील अट क्रमांक ८ नुसार काम सुरु केल्यापासून १ वर्षाच्या आत काम पूर्ण करणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत काम पूर्ण झालेले नाही. दलितवस्तीत आवश्यक त्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी सदरची योजना कार्यान्वित करण्यात आली असून काम अपूर्ण असल्यामुळे सदर योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

तरी सदरचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. काम पूर्ण न झाल्यास मंजूर आदेशातील अट क्रमांक ८ नुसार वितरीत अनुदान ग्रामपंचायतीकडून वसूल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना प्रलंबित अफरातफर प्रकरणांबाबत.**

पंचायत समिती पेठ अंतर्गत ग्रामपंचायतींमधील ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजनेतील अफरातफर प्रकरणांची माहिती अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक १४.१०.२००८ अन्वये मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) ग्रामनिधीतील एकूण १४ अफरातफर प्रकरणांमध्ये एकूण रुपये ६,८१,३७५/- रक्कम समाविष्ठ असून त्यापैकी एकूण ८ प्रकरणांतील रक्कम रुपये ९१,१०५/- ची वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरित एकूण ६ प्रलंबित प्रकरणांमध्ये रुपये ५,९०,२७०/- ची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

२) जवाहर रोजगार योजनेतील एकूण १४ अफरातफर प्रकरणांमध्ये एकूण रुपये ६,७२,०११/- एकूण समाविष्ठ असून त्यापैकी रुपये १,२०,००१/- इतक्या रक्कमेची वसूली झाली असून रुपये ५,५२,०१०/- ची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनांक ३.९.२००५ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे

व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणांत वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणांतील अपहारीत रक्कम वसूल न झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेच्या पावत्या प्राप्त न केल्याबाबत.**

पंचायत समिती पेठ यांनी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात एकूण ७३ ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | प्र. क्र. | दिनांक | अनुदानाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ५९ | ३१.३.२००८ | जमीन समानीकरण अनुदान | ३६,००० |
| | | | जमीन महसूल अनुदान | ११,७१० |
| | | | आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना वित्तीय सहाय्य अनुदान | २७,१६४ |
| | | | **एकूण** | **७४,८७४** |
| २ | ६० | ३१.३.२००८ | गौण खनिज अनुदान | १,८२,३४० |
| | | | जमीन महसूल अनुदान | १६,००० |
| | | | **एकूण** | **१,९८,३४०** |

उपरोक्तप्रमाणे अनुदान एकूण ७३ ग्रामपंचायतींना वाटप करण्यत आले असून संबंधित ग्रामपंचायतींनी सदर वितरीत अनुदानाची नोंद त्यांच्या लेख्यात घेऊन नमुना नंबर ७ मधील पावती पंचायत समितीस सादर करणे आवश्यक असतांना फक्त २० ग्रामपंचायतींकडून पावत्या प्राप्त झाल्या असून उर्वरित ५३ ग्रामपंचायतींकडून त्या प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींनी प्राप्त अनुदान त्यांचे लेख्यात जमा केल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

तरी उर्वरित सर्व ग्रामपंचायतींकडून वितरीत अनुदानाच्या पावत्या प्राप्त करुन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- देयकांवर अनुदान नमुद न केल्याबाबत.**

पंचायत समिती पेठ यांचेकडील प्रदान देयकांचे लेखापरीक्षण केले असता देयक प्रदान करतांना देयकांवर प्राप्त अनुदान, प्रस्तुत देयकासह झालेला खर्च व शिल्लक अनुदान इत्यादी आवश्यक तपशिल नमुद केलेला नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम ११० ते ११८ मधील तरतुदींनुसार मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करता येत नाही.

देयकांवर अनुदान तपशील नमुद केलेले नसल्याने सन २००७ – २००८ मधील प्रत्येक महिन्यात प्राप्त अनुदानापेक्षा जास्त खर्च झाला किंवा कसे? तसेच सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात प्रत्येक लेखाशिर्षनिहाय व लेखाशिर्षाअंतर्गत तपशीलवार शिर्षनिहाय झालेला खर्च हा मंजूर अनुदानाच्या मर्यादेत आहे किंवा कसे? याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

तरी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात प्रत्येक लेखाशिर्ष व तपशीलवार लेखाशिर्षनिहाय मंजूर अनुदानाच्या मर्यादेतच खर्च झाल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- विद्युत देयकात विज शुल्कापोटी प्रदान केल्याबाबत.**

पंचायत समिती पेठ यांच्या कार्यालयाचे विज देयकाची पडताळणी केली असता त्याचे प्रमाणक क्रमांक ५५ दिनांक १४.३.२००८ अन्वये ११,११२/- प्रदान करण्यात आले आहेत. सदर विज देयकात रुपये २८५/- विज शुल्काची आकारणी करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चा नियम १४७ टिप ३ नुसार विज देयक प्रदान करण्यापूर्वी सदर देयकात विज शुल्काचा समावेश करण्यात आलेला नसल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहेत. तसेच त्यात विलंब शुल्काचा समावेश करण्यात आलेला नसल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

प्रत्यक्षात सदर देयकात रुपये २८५/- इतके विज शुल्क आकारणी केलेली असतांना तसेच रुपये ८,६९४/- इतकी थकबाकी रक्कमेची आकारणी केलेली असतांना विलंब शुल्काची आकारणी समाविष्ठ आहे किंवा कसे ? याबाबत प्रमाणित केलेले नाहीत.

तरी सदर विज देयकांत विलंब शुल्काचा समावेश नसल्याची खात्री करुन तसे प्रमाणित करावे विज शुल्क आकारणी बंद करणेबाबत विद्युत मंडळाकडून कार्यवाही करुन घेऊन तसेच इतर सर्व कार्यालयातील विज देयकांची पडताळणी करुन अशी आकारणी होत नसल्याची खात्री करुन तसे प्रमाणित करावे व पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- वेतनपटावर मुद्रांकीत पोहच न घेतलेबाबत.**

पंचायत समिती पेठ यांचेकडील सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील वेतन देयकांची पडताळणी केली असता वेतन देयकांवर संबंधित कर्मचा-यांची मुद्रांकीत पोहच घेतलेली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.डी.ओ-१००५/ प्र.क्र५/कोषा/प्रशा-५ दिनांक २९.८.२००५ नुसार वेतनपटावर स्वाक्षरी केल्याशिवाय खात्यातून रक्कम काढण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तथापि पंचायत समिती पेठ यांनी कोणत्याही कर्मचा-यांच्या सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात मुद्रांकीत स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. तरी सर्व कर्मचा-यांच्या मुद्रांकीत स्वाक्ष-या घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- शिलकी रकमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत.**

जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ मधील नियम ४२ नुसार गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कार्यदिनी रोखपालाच्या रोकडवहीतील शिलकी रकमेची तपासणी करावी. तसेच तीन महिन्यातून किमान एकदा कोणत्याही अनिश्चित दिवशी शिल्लक रक्कम तपासुन ती रक्कम कॅशबुकातील शिलकी रकमेशी जुळते याची खात्री करुन घ्यावी व तसे प्रमाणपत्र कॅशबुकमध्ये नोंदविण्यात यावे अशी तरतुद असतांना पंचायत समिती, पेठने अशापध्दतीने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासकीय व्यवहारांवर योग्य प्रकारचे नियंत्रण नाही.

तसेच रोकडवहीवर माहे नोव्हेंबर २००७ पासुन गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या नाहीत. प्रभावी नियंत्रणाअभावी गैरव्यवहार करण्यास चालना मिळत असते. तरी याबाबत सदरची पूर्तता करुन सक्षम प्राधिका-याचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- लघुपाटबंधारे उपविभाग पेठ यांचेकडील नमुना नंबर ३९ बाबत.**

उपविभाग (लघुपाटबंधारे) यांनी नमुना नंबर ३९ दप्तरी ठेवलेली आहे.

सदरच्या नोंदवहीत खालीलप्रमाणे त्रुटी आहेत.

१. नोंदवहीतील सर्व रकान्यात नोंदी केलेल्या नाहीत. एकूण १४ रकान्यांपैकी ८ ते १४ रकान्यात नोंदी नाहीत.

२. सदरच्या नोंदवहीत उपविभागाने सन २००२ – २००३ अथवा तत्पूर्वीपासून पूर्ण केलेल्या पाझर तलाव के. टी. वेअर व गावतळे यांच्या नोंदी नमुद नाहीत. जी कामे पूर्ण

करण्यात आलेली आहेत. त्या कामांच्या नोंदी नमुना नंबर ३९ ला घेण्याची जबाबदारी उपविभागाची आहे. परंतु उपविभागाचे सक्षम अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही.

तरी सर्व पाझर तलाव के. टी. वेअर व गावतळे यांच्या परिपूर्ण नोंदी घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- बांधकाम उपविभाग पेठ यांचेकडून नोंदवह्यांबाबत**

पंचायत समिती पेठअंतर्गत बांधकाम उपविभाग (इ व द) यांचेकडील नोंदवह्या नमुना नंबर ३९, ४० व ४१ ची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) नमुना नंबर ३९ नोंदवही रकाना क्रमांक ७, ८ व ९ मध्ये वाढ, घट बाबत आवश्यक तो तपशिल नमुद केलेला नाही.

२) नमुना नंबर ४० रस्ता नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक ४६ वर सन २००६ – २००७ व २००७ – २००८ मध्ये पूर्ण झालेल्या रस्त्याची नोंद आहे. उर्वरित सन २००८ मध्ये कोणतीही नोंद घेतलेली नाही.

३) नमुना नंबर ४१ नोंदवही सन २००५ – २००६ पर्यंत ताबा घेतलेल्या जमिनींची नोंद घेतलेली आहे. पुढील कुठलीही नोंद घेतलेली नाही.

४) नमुना नंबर ४१ मधील जमिनीचे ७/१२ उतारे घेऊन सदर जमीन जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याची खात्री करुन तसेच त्या जागेत अतिक्रमण झालेले नसल्याबाबत उपअभियंता विभाग यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

याबाबत मागील सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात क्र. १३ अन्वये आक्षेप नोंदवूनही पूर्तता करण्यात आलेली नाही. याबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्तप्रमाणे पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- जंगम मालमत्ता नोंदवहीबाबत.**

पंचायत समिती पेठ जिल्हा नाशिक यांचेकडील बांधकाम विभाग ( इ व द) यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नियम ९० नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना क्रमांक ३२ उपविभागाने दप्तरी ठेवलेली आहे. तथापि सदरच्या नोंदवहीत सन २००५ – २००६, २००६ – २००७ व २००७ – २००८ या वित्तीय वर्षाअखेरीस म्हणजे जून अखेर अस्तित्वात असलेल्या म्हणजेच टेबल, खूर्ची,

कपाट, पंखे, इत्यादी जड संग्रह वस्तु सुस्थितीत व विहित वापरात असलेबाबत मोजून तपासून बरोबर असल्याचे प्रमाणपत्र संबंधित उपविभागाचे उपअभियंता यांनी सदरच्या नोंदवहीत नोद करणे आवश्यक आहे. परंतु संबंधितांनी प्रमाणपत्र नोंदविलेले नसल्याने नोंदवहीत नमुद केलेले सर्व साहित्य बरोबर असल्याबाबत खातरजमा लेखापरीक्षणास करता आली नाही.

योग्य ते पूर्ततेसह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- अधिकारी वा कर्मचारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती, पेठ येथील सन २००७-०८ वर्षात खालीलप्रमाणे नमुद अधिकारी वा कर्मचारी यांच्या मासिक दैनंदिन्या मुदतीत प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. डी. एस. खंबाईत | ग्रामविस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) | सप्टें.०७ ते मार्च ०८ |
| २ | श्री. आर. ए. पगार | ग्रामविस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) | एप्रिल ०७ ते मार्च ०८ |

उपरोक्त नमुद अधिकारी वा कर्मचारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना त्यांना नियमबाह्यपणे वेतन व भत्ते अदा करणेबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. या संपूर्ण कालावधीत हे सर्व कर्मचारी व अधिकारी विहित कर्तव्यासाठी कार्यरत असल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- शासकीय निधीचा भरणा जिल्हा बँकेत करणेबाबत.**

पंचायत समिती पेठ अंतर्गत ३ शिक्षण या लेखाशिर्षकाखाली गैरहजर बालवाडी वेतन ५,०००/- चा भरणा दिनांक १९.९.२००७ रोजी पंचायत समितीने चलनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा पेठ येथे केलेला आहे.

बालवडी मानधनाची रक्कम शासन निधीतून खर्च करण्यात येत असल्याने सदरची रक्कम ही कोषागारात चलनाने भरणा करणे क्रमप्राप्त असतांना संबंधितांनी जिल्हा बँकेत जमा करुन अनियमितता केलेली आहे.

आता सदरची रक्कम जिल्हा बँकेतून काढून कोषागारात शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेणेबाबत.**

पंचायत समिती, पेठचे सन २००७-०८ कालावधीतील या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " ५ "नुसार कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३(३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- पंचायत समिती स्टेशनरी साठा नोंदवहीबाबत.**

पंचायत समिती, पेठकडील सन २००७-०८ या वित्तीय वर्षासाठीच्या स्टेशनरी साठा नोंदवहीची तपासणी केली असता, दिनांक १४.२.२००८ रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांचेकडून वर्ग ४ कर्मचा-यांसाठी जे गणवेष प्राप्त झालेत त्यांचे काही प्रमाणात वाटप केलेले आहे. परंतु संबंधीत कर्मचा-यांना किती मीटर कपडा दिला व त्यानंतर किती शिल्लक राहिला याचा गोषवारा नमुद नसल्याने वाटप केलेले गणवेष कपडा व शिल्लक कपडा याची खात्री करता आली नाही. सदरची नोंदवही पूर्ण करुन कापडाच्या विनियोग अहवालासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजुर कराराची फॉर्म नंबर ४८ मधील नमुन्यात नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेण्यात यावी व प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी करावी अशी तरतुद आहे. मात्र पंचायत समिती, पेठने अशाप्रकारची नोंदवही परीरक्षीत केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार

केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे, इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी फॉर्म नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- अर्धसमास पत्राद्वारे विचारलेल्या माहितीबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण अंतिमीकरणापर्यंत खालील नमुद तपशिलाप्रमाणे अर्धसमास पत्राद्वारे मागवलेली माहिती मुदतीनंतरही प्राप्त झालेली नाही.

| अ. क्र. | अर्धसमास पत्र क्र. | दिनांक | मागवलेली माहिती |
|---|---|---|---|
| १ | ३ | १४.१०.२००८ | ग्रामसेवक/विस्तार अधिकारी बदली झाल्यानंतर कार्यभार हस्तांतरण नोंदवही व कार्यभार हस्तांतरीत केलेला नसल्यास त्याची माहिती |
| २ | ५ | १४.१०.२००८ | निवासस्थान भाडे वसूली व रिक्त असलेल्या निवासस्थानाबाबत |
| ३ | ७ | १४.१०.२००८ | शिक्षण / ग्रामसेवक (नविन नेमणूका) जात पडताळणीबाबत व इतर कर्मचारी |
| ४ | ९ | १४.१०.२००८ | शाळा खोल्यांची सद्याची स्थिती |
| ५ | १० | १४.१०.२००८ | वाहन दुरुस्ती व इंधन खर्चाबाबत |
| ६ | ११ | १४.१०.२००८ | यंत्र सामुग्रीबाबत |
| ७ | १४ | १४.१०.२००८ | कुटूंब निवृत्ती वेतन विहित कालावधीनंतर कमी केल्याबाबत |
| ८ | १५ | १४.१०.२००८ | गृहनिर्माण कर्जाची माहिती (शिक्षण विभाग) |
| ९ | १६ | १४.१०.२००८ | जरोयो/विघयो/विहिरींची माहिती |
| १० | १७ | १७.१०.२००८ | शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदान अनियमिततेबाबत |
| ११ | १८ | १७.१०.२००८ | १९ निवृत्ती वेतन प्रदान अभिलेख्यातील अनियमिततेबाबत |
| १२ | २० | २२.१०.२००८ | ग्रामविकास अधिकारी / विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणी केल्याबाबत सन २००७ – २००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | २२ | २३.१०.२००८ | लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध न केल्याबाबत निवासस्थान नोंदवही, जडसंग्रह नोंदवही, ग्रामसेवक दैनंदिनी, स्टेशनरी नोंदवही, मुद्रांक साठा नोंदवही |
| १४ | २४ | २३.१०.२००८ | मुख्यालयी वास्तव्याचे दाखले उपलब्ध करुन देणे. |

उपरोक्त नमुद अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केलेली माहिती दिलेल्या मुदतीपर्यंत दिलेली नाही. याबाबत स्थानिक निधी लेखा परीखा अधिनियम १९३० चे कलम ७ अन्वये मा. विभागीय आयुक्तांकडे दंडनीय कारवाईसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे. त्यावरील मा. आयुक्तांचे आदेशांन्वये उचित कार्यवाही करुन त्यावरील पुर्तता अहवालासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- आक्षेप विवरणपत्र**

लेखा परीक्षणांत आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखा परीक्षण कालावधीत करुन घेतल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक ३२ :- लेख्यांची स्थिती.**

लेख्यांची स्थिती असमाधानकारक असून लेखे सुधारण्यास वाव आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३३ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे पंचायत समितीचे सन २००६-२००७ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३४ :- अनुपालन व पोहोच.</u>**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे अनुपालन, चार महिन्यांचे आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतिसह तीन प्रतीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे, तसेच अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच दयावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

**<u>प्रत सविनय सादर</u>**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :-</u>**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) म. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पेठ, जि. नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक